ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5484. Licence No. 53.

वर्ष २३ पुणें, बुधवार तारीख १३ मार्च, १९५७ अंक ११

## विविध माहिती

**यांत्रिक हत्यारांचा उद्योगधंदा**—भारतामधील यांत्रिक हत्यारांच्या उद्योगधंद्याची वाढ करण्याच्या दृष्टीनें चर्चा करण्यासाठी अमेरिकन कारखानदारांच्या १४ प्रतिनिधींनीं अमेरिकेच्या व्यापार खात्याच्या प्रतिनिधींची गांठ घेतली. प्रेसिडेंट आयसेन होअर ह्यांच्या परदेशांना मदत करण्याच्या कार्यक्रमाला धरून बैठकींत विचारविनिमय करण्यांत आला.

**मद्रासच्या विद्यार्थिनीला बक्षिस**—ब्रिटन व ब्रिटिश लोकांचें जीवन ह्या विषयावर उत्कृष्ट निबंध लिहिल्याबद्दल मद्रास विद्यापीठाची विद्यार्थिनी श्रीमती कुमार ह्यांना लीडस कॉलेज ऑफ कॉमर्सनें खास बक्षिस दिलें आहे. श्रीमती कुमार ह्या ग्रंथपालनाच्या व्यवसायाचें शिक्षण घेण्यासाठी सध्या ब्रिटनला गेल्या आहेत.

**नवीन मालवाहू बोट**—' इंडिआ स्टीमशिप कंपनी ' साठीं एका जर्मन कंपनीनें एक मालवाहू बोट बांधण्याचें काम घेतलें होतें. सदर बोट समुद्रांत लोटण्याचा समारंभ हँबुर्ग येथें साजरा करण्यांत आला. बोटीचें वजन १२,०८० टन असून तीवर १२० टन वजन उचलणारी यारी बसविण्यांत आली आहे. भारत व ब्रिटन ह्यांच्या दरम्यान ती वाहतूक करील.

**भिलई कारखान्यासाठी एंजिनिअर्स**—रशिआच्या मदतीनें भिलई येथें काढण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्यांत काम करण्यासाठी ८० हिंदी एंजिनिअर्सना शिक्षणासाठी रशिआंत पाठविण्यांत आलें आहे. १० एंजिनिअर्सची आणखी एक तुकडी नुकतीच रवाना झाली. रशिआंत पाठविण्यांत आलेली ही तिसरी तुकडी आहे.

**कापड-गिरणी कामगारांना बोनस**—ग्वाल्हेर येथील जिवाजीराव कापड गिरणींतील ६,००० कामगारांना १९५५ व १९५६ सालासाठी मिळून ८ लाख रुपयांची रकम बोनस म्हणून मिळणार आहे. १९५५ सालासाठी १॥ महिन्याचा पगार व १९५६ सालासाठी १। महिन्याचा पगार बोनस म्हणून देण्याचा करार करण्यांत आला आहे.

**अमेरिकेंतील आयुर्मान वाढत आहे**—अमेरिकेच्या सामाजिक सुरक्षितता कमिशनरनें असा निष्कर्ष काढला आहे कीं, अमेरिकेंतील लोकांचें आयुर्मान वाढत चाललें आहे. अमेरिकेंत ५,००० नागरिकांनीं वयाची शंभरी ओलांडली आहे. पण पुष्कळदां ६५ पेक्षा अधिक जगणारीं माणसें आपल्याजवळील शिलकी पुंजी ५ वर्षांतच खलास करतात, असें आढळून आलें आहे.

**काश्मीरपेक्षा अन्न महत्त्वाचें**—पाकिस्तानचे अध्यक्ष इस्कंदर मिर्झा लाहोरला गेले असतां त्यांनीं पत्रकारांना मुलाखत दिली. काश्मीरविषयीं त्यांना प्रश्न विचारण्यांत आले असतांना ते म्हणाले कीं, मला काश्मीरच्या प्रश्नापेक्षा पाकिस्तानांतील अन्नधान्याच्या परिस्थितीविषयीं अधिक चिंता वाटते. पाकिस्तानांतील अन्नाचा तुटवडा आधीं दूर केला पाहिजे.

**छोट्या उद्योगधंद्यांना मदत**—राज्यांतील छोट्या उद्योगधंद्यांना आर्थिक मदत देण्यासाठी म्हैसूर सरकारनें अर्बन इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह सोसायटी स्थापन केली आहे. अशा प्रकारच्या आणखी तीन संस्था स्थापन करण्यांत येणार आहेत. भारत सरकारकडून २० लाख कर्ज मिळणार आहे.

**विद्यापीठाला देणगी**—जर्मनींतील गॉटिन्जेन विद्यापीठांत काम करणाऱ्या एका प्राध्यापकानें आपलें घर व वाचनालय ह्यांची देणगी विद्यापीठाला देण्याचें ठरविलें आहे. प्राध्यापक भारतीय संस्कृतीचे गाढे विद्वान आहेत. त्यांच्या ग्रंथालयांत प्राचीन भारताविषयींच्या उत्तमोत्तम व दुर्मिळ ग्रंथांचा संग्रह आहे. त्यांचा संस्कृतचा व्यासंगहि दांडगा आहे.

**शेतकऱ्यांची वसाहत**—केरळमधील १०० शेतकरी कुटुंबांना मध्यप्रदेशांत वसाहत स्थापून देण्याची योजना भारत सरकारनें मंजूर केली आहे. प्रत्येक कुटुंबाला २५ एकर जमीन लागवडीसाठी देण्यांत येईल. त्याशिवाय घर बांधण्यासाठी १,६०० रुपये आणि शेतीचीं अवजारें विकत घेण्यासाठी १,६५० रुपये कर्ज म्हणून देण्यांत येतील.

**अमेरिकेकडे मदतीची मागणी**—केरळ राज्य सरकारच्या मालकीची त्रावणकोर रबर वर्क्स ही कंपनी अमेरिकेकडून तांत्रिक साह्य मिळविण्याची खटपट करीत आहे. सध्याच्या कारखान्याचा विस्तार करण्यासाठी व नवीन वस्तू तयार करण्यासाठी कारखान्याला मदत हवी आहे. आपला तांत्रिक नोकरवर्ग अमेरिकेला शिकण्यास पाठविण्याची चालकांची तयारी आहे.

**हें स्त्री-दाक्षिण्य नाहीं**—अमेरिकेंतील दक्षिण कॅरोलिना राज्याच्या कायदेमंडळापुढें एक बिल मांडण्यांत आलें आहे. बसमध्यें स्त्री-उतारू बसलेल्या बाकावर शेजारीं बसण्यापूर्वी परवानगी मागण्यांत यावी अशी सक्ति बिलांत करण्यांत आली आहे. मात्र ह्यांत स्त्री-दाक्षिण्य बुद्धि नाहीं. राज्यांत फेडरल सरकारचे वर्णविषयक कायदे जारी करण्यांत आले तर निग्रो पुरुषांनीं श्वेतवर्णीय स्त्री शेजारीं बसूं नये, म्हणून ही दक्षता घेण्यांत येत आहे.

## भारतीय खनिज संपत्तीचें प्रदर्शन

### लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाचा उपक्रम

पुणें येथील लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या विद्यमानें सुप्रसिद्ध भारतीय उद्योगपति जमशेटजी टाटा यांच्या जन्मदिनीं, दि. ३ मार्च १९५७ रोजीं, संग्रहालयांत 'भारतीय खनिज संपत्ति' या विभागाचें उद्घाटन श्री. न. वि. गाडगीळ, भारत सरकारच्या वीज, बांधकाम व खाणी खात्याचे माजी मंत्री, यांच्या हस्तें करण्यांत आलें.

हा विभाग उघडण्याचे कामीं संग्रहालयाला भारत सरकारच्या नैसर्गिक संपत्ति मंत्रालय व त्यांचे देखरेखीखालील जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, अणू शक्ति संशोधन विभाग, ब्युरो ऑफ माइन्स्, इत्यादींचें बहुमोल साहाय्य होत आहे. त्याचप्रमाणें भारतांतील इतर राज्य सरकारांचेंहि सहाय्य होत आहे. खाजगी खाणी मालक व या उद्योगाशीं संबंधित असणाऱ्या इतर संस्था यांचेंहि या उपक्रमास साहाय्य मिळत आहे.

खनिजांचे नमुने देणाऱ्यांमध्यें भारत सरकारच्या विविध खात्यांशिवाय म्हैसूर सरकारचा जिऑलॉजी विभाग, म्हैसूर आयर्न वर्क्स, टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी, इंडियन कॉप्पर कॉर्पोरेशन, शिवराजपूर सिंडिकेट, असोशिएटेड सिमेंट कंपनी, पैसा फंड ग्लास वर्क्स, ॲल्युमिनियम कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, परशुराम पॉटरी वर्क्स, शिवराय बॉक्साइट प्रॉडक्टस्, कोलार गोल्ड फिल्ड्स् अंडरटेकिंग्ज, ई. एफ्. ओमरे, वगैरे प्रमुख आहेत.

म्हैसूर जिऑलॉजिकल डिपार्टमेंटकडून म्हैसूर भागांतील २१ खनिजांचे नमुने, टाटा आयर्न–स्टीलकडून सुमारें ६० चे वर नमुने, शिवराजपूर सिंडिकेटकडील मँगनीज नमुने, इंडियन कॉपर कॉर्पोरेशनकडून तांब्याचे खनिज व इतर ६ नमुने, ॲल्युमिनियम कॉर्पोरेशनकडून बॉक्साईटपासून ॲल्युमिनियमपर्यंत विविध पायऱ्या दाखविणारे नमुने, ॲटॉमिक एनर्जी कमिशनकडील १२ नमुने व कोलार येथील सोन्याच्या खाणींतील विविध खनिजांचे ११ नमुने आणि ए. सी. सी. कडील सिमेंट उपयोग धंद्यांतील मालाचे सुमारें १० नमुने हे प्रमुख होत. याशिवाय इ. एफ्. ओमरे, कृष्णा मायानिंग कंपनी, यांनीं पाठविलेले वरील व इतर नमुने त्याचप्रमाणें परशुराम पॉटरी वर्क्स व पैसा फंड ग्लास वर्क्स यांनीं पॉटरी धंद्यांतील खनिज पदार्थांचें पाठविलेले नमुने, इंडियन पेंटट स्टोन कंपनी, शहाबाद स्टोन कंपनी, यांनीं पाठविलेले फरशांचे नमुने हेहि उल्लेखनीय आहेत.

या विभागाच्या उद्घाटनाचे निमित्तानें संग्रहालयातर्फे कॉमनवेल्थ इमारतींतील संग्रहालय-सभागृहांत 'भारतीय खनिज संपत्ति' हें प्रदर्शन उघडण्यांत आलें आहे.

या प्रदर्शनांत भारतांत सांपडणाऱ्या बहुतेक सर्व खनिजांचे नमुने मांडण्यांत आले आहेत. हे खनिजांचे नमुने सुमारें ४०० असून याशिवाय महत्त्वाची गोष्ट म्हणजे या खनिजांचा प्रत्यक्ष व्यवहारांत होणारा उपयोग दर्शविणारे तयार मालाचे नमुनेहि सोबत मांडण्यांत आले आहेत. अशा नमुन्यांची संख्या जवळ जवळ तेवढीच आहे.

प्रदर्शनामध्यें भारतांतील दगडीकोळसा, लोखंड, मँगॅनीज, बॉक्साइट, अभ्रक, तांबें व सोनें, हिरे वगैरेंची मूल्यवान खनिजें, यांचेबरोबर सिमेंट, कांच, पॉटरी व इतर अनेक उद्योगधंद्यांस लागणारीं खनिजें यांचा समावेश करण्यांत आला आहे.

याशिवाय अणुशक्ति निर्मितीस लागणारीं युरेनियम, थोरियम, टिटॅनियम, इत्यादींची खनिजें ठेवण्यांत आलीं आहेत.

खाण धंद्यासंबंधी माहिती देणारे उद्बोधक असे विविध तक्ते, त्याचप्रमाणें कांहीं प्रमुख खनिजांचे विविध उद्योगधंद्यांत होणारे उपयोग दाखविणारे तक्ते, याशिवाय अनेक चित्रें, नकाशे, फोटो, मॉडेल्स, इत्यादींमुळें हें प्रदर्शन अत्यंत आकर्षक व उपयुक्त झालें आहे.

हें प्रदर्शन दि. ४ रोजीं सुरू झालें व ते १९ मार्च अखेरपर्यंत रोज दुपारी २॥ ते ५ विद्यार्थ्यांसाठीं व ५ तें ७॥ जनतेसाठीं विनामूल्य उघडें ठेवण्यांत येणार आहे.

---

## अंबर चरखा कार्यक्रमाची प्रगति

जानेवारी १९५७ अखेरपर्यंत ५०,०२६ अंबर चरखे तयार करण्यांत आलें होते. डिसेंबर १९५६ अखेरचा आंकडा ३७१३५ होता. या चरख्यांपैकी २०,१३४ चरखे स्वतंत्रपणें सूतकताईचें काम करणाऱ्यांना वांटण्यांत आले आहेत.

याच काळांत अंबर चरख्यावर कातण्यांत आलेलें सूत ३,२०,००,८८५ रत्तल भरलें. डिसेंबर १९५६ अखेर २,१४,७११ पौंड सूत कातण्यांत आलें होतें. अंबर चरख्यावरील सुतापासून तयार करण्यांत आलेलें कापड जानेवारी १९५७ अखेर ७,८१,६८७ चौरस वार भरलें. अपुऱ्या मिळालेल्या माहितीवरून पाहतां, जानेवारी १९५७ अखेर ४४८१ चौ. वार कापड व्यापारी प्रमाणावर तयार करण्यांत आलें होतें. आतांपर्यंत एकूण १५,६४५ चौरस वार अंबर कापड विकण्यांत आलें.

चरखा शिक्षकांच्या शिक्षणासाठीं उघडण्यांत आलेल्या ३५ विद्यालयांपैकी प्रत्यक्षांत ३० चालू असून १५०६ जण शिक्षण घेत आहेत. आतांपर्यंत १४०१ जणांचें शिक्षण पार पडलें असून ८४० जणांची परिश्रमालयांत नेमणूक करण्यांत आली आहे. याचप्रमाणें २७० मिस्त्रींचें शिक्षण चालू असून शिक्षण पुरें झालेल्या २१९ जणांना नोकऱ्या देण्यांत आल्या आहेत.

परिश्रमालयांची संख्या ठरविल्यापेक्षां अधिक झाली असून आतां अशी ३२९ परिश्रमालयें चालू आहेत. त्यांमध्यें ३०,६०४ जण कताईचें शिक्षण घेत आहेत. १९,६४८ जणांचें शिक्षण पुरें झालें.

अंबर कापडाच्या उत्पादनांतहि सतत वाढ दिसून येत असून, पूर्वी अंदाज केल्यापेक्षा अधिक म्हणजे सुमारें ४० लक्ष वार अंबर कापड १९५६–५७ मध्यें तयार होईल. तसेंच मार्च १९५७ अखेर व्यापारी कामांसाठी २२,५०,००० वार कापड उपलब्ध होईल.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

अर्थ

बुधवार, ता. १३ मार्च, १९५७



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## सिमेंटच्या उत्पादनांत वाढ होणार

दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारतामधील सिमेंटचें उत्पादन १ कोटी टनांनीं वाढणार आहे. सध्यां भारतांत दरसाल ६० लाख टन सिमेंट तयार होतें. देशांतील सिमेंटच्या कारखान्यांची आजची संख्या २८ आहे. त्यांपैकी एक कारखाना उत्तर प्रदेश सरकारच्या मालकीचा व दुसरा म्हैसूर सरकारच्या मालकीचा आहे. बाकीचे कारखाने खाजगी भांडवलदारांचे आहेत. त्यांपैकी सात बिहार राज्यांत, चार मुंबई राज्यांत, तीन मद्रास राज्यांत आणि प्रत्येकी दोन कारखाने म्हैसूर, आंध्र, मध्यप्रदेश, राजस्थान व पंजाब ह्या राज्यांत आहेत. त्याशिवाय ओरिसा व केरळमध्यें एक एक कारखाना आहे. १९६० च्या सुमारास देशांतील सिमेंटच्या कारखान्यांची संख्या ६४ होईल आणि सर्व कारखाने मिळून दरसाल १.६ कोटी टन सिमेंट निर्माण करतील. मध्यवर्ती सरकारनें ३१ नवे कारखाने काढण्याची व कांहीं चालू कारखान्यांची उत्पादनक्षमता वाढविण्याची योजना तयार केली आहे. नवीन कारखान्यांपैकी ७ कारखाने आंध्र राज्यांत, ७ मुंबई राज्यांत, मध्यप्रदेश व राजस्थान ह्या राज्यांत प्रत्येकी तीन, आसाम, पश्चिम बंगाल व मद्रास राज्यांत प्रत्येकी दोन, आणि उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, पाँडीचेरी व म्हैसूरमध्यें प्रत्येकी एक, असे कारखाने काढण्यांत येणार आहेत. सिमेंटच्या धंद्यांत सध्यां सुमारें ३०,००० कामगारांना रोजगार मिळालेला आहे. सिमेंटच्या कारखान्यांत हल्लीं सुमारें ४० कोटी रुपयांचें भांडवल गुंतलेलें आहे. धंद्याचा विस्तार करण्यासाठी आणखी सुमारें ५० ते ६० कोटी रुपयांचें भांडवल गुंतवावें लागेल. नवीन कारखान्यांतून कामें करण्यासाठी ५० ते ६० हजार अधिक कामगारांची जरूरी लागेल.

---

## कुटुंब नियोजनाच्या माहितीचें सरकारी पुस्तक

भारत सरकारनें कुटुंबनियोजनाची आवश्यकता मान्य केलेली असून त्याचा प्रचार करण्यासाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ५ कोटी रुपयांची तरतूदहि केली आहे. तथापि, ह्या बाबतींत पुढाकार घेण्याचें काम राज्य सरकारांकडेच प्रामुख्यानें आहे. मद्रास सरकारनें कुटुंबनियोजनाचा प्रसार करण्यासाठी एक बोर्ड स्थापन केलें आहे. ह्या बोर्डानें, कुटुंब नियोजन हा विषय नाजूक आणि नागरिकांच्या खाजगी जिवनाशीं संबंधित असल्यानें ह्या बाबतींत लोकांचीं मनें तयार करण्यावरच पुस्तकांत अधिक भर देण्यांत आलेला आहे. स्त्री-पुरुषांमधील संबंधाबद्दल पुस्तकांत तपशीलवार व कांहींशी गुप्त समजली जाणारी माहिती स्पष्टपणें देण्यांत आलेली आहे. हा विषय असा आहे कीं त्याबद्दल उघड रीतीनें चर्चा करणें शिष्टसंमत मानण्यांत येत नाहीं. त्यांतहि सरकारनें अशा विषयाला हात घालणें तर फारच अप्रशस्त मानले जाण्याची शक्यता आहे. पण मद्रास सरकारनें हा विषय स्पष्टपणें हातीं घेण्याची वेळ आतां आली आहे असें मानून कुटुंबनियोजनाचा प्रचार अधिकृतरीत्या करण्यास सुरुवात केली आहे. कुटुंबनियोजनाचे ८ निरनिराळे प्रकार पुस्तकांत चर्चिण्यांत आले आहेत. त्याचप्रमाणें प्रत्येक पद्धतीच्या गुण-दोषांचें विवेचनहि करण्यांत आलेलें आहे. भारतामधील लोकांची सामाजिक व आर्थिक परिस्थिति लक्षांत घेऊन कोणती पद्धत स्वीकारणें अधिक सोईचें आहे, ह्यासंबंधी मार्गदर्शनहि करण्यांत आलेलें आहे.

---

## भारतामधून साखरेची निर्यात होऊं लागली

भारतामधील साखरेच्या कारखान्यांनीं १९५५-५६ च्या हंगामांत आतांपर्यंत सर्वांत अधिक म्हणजे १८.५६ लाख टन साखर निर्माण केली. १९५४-५५ च्या हंगामांत १५.९० लाख टन साखर तयार झाली होती. साखरेच्या उत्पादनांत ही जी वाढ झाली ती झाली नसती तर साखरेची आयात करावी लागली असती आणि त्यामुळें परदेशीय हुंडणावळीच्या साठ्यांवर मोठा ताण पडला असता. १९५४-५५ सालीं भारताला ६,७५,४९८ टन साखर आयात करावी लागली होती आणि त्यासाठी ३७.३६ कोटी रुपये द्यावे लागले होते. १९५५-५६ सालांतहि भारतानें ८०,६९१ टन साखर आयात केली. पण ही साखर घेण्याचे करार पूर्वींच झाले असल्यामुळें ती घेणें भागच होतें. पण गेल्या तीन वर्षांत देशांतील साखरेचें उत्पादन बरेंच वाढलें आहे. इतकेंच नव्हे, तर थोड्याबहुत प्रमाणांत साखर निर्यात करण्या-इतकें उत्पादन वाढलें आहे. कांहीं दिवसांपूर्वी इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनला ५०,००० टन साखर निर्यात करण्याची परवानगी देण्यांत आली होती. आंतरराष्ट्रीय बाजारांत साखरेला चांगली मागणी असल्यामुळें ही साखर सहज खपूं शकली. त्यानंतर अलीकडे आणखी ५०,००० टन साखर निर्यात करण्याची परवानगी देण्यांत आली आहे. कांहीं वर्षांपूर्वी भारतांत साखरेचा शिलकी सांठा होता. परंतु त्यावेळीं भारतामधील साखरेच्या किंमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंतील इतर देशांतील साखरेच्या मानानें अधिक होत्या. त्यामुळें निर्यात करणें अशक्य होतें. भारतामधील साखरेला कायमची बाजारपेठ लाभेल किंवा नाहीं हें सांगणें कठीण आहे. कारण, ह्या साखरेची उत्पादनाची किंमत इतर उत्पादकांच्या मानानें अधिक आहे.

---

## एअर इंडिआ इंटरनॅशनलला मदत

एअर इंडिआ इंटरनॅशनल कंपनीनें अमेरिकेंतील बोइंग कॉर्पोरेशनकडून जेटवर चालणारीं तीन विमानें विकत घ्यावयाचें ठरविलें आहे. विमानें विकत घेण्यासाठी ५ अमेरिकन व्यापारी बँकांनीं व जागतिक बँकनें मिळून कंपनीला १.६८ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे. विमानांचीं ९ सुटीं एंजिनें आणि इतर सुटे भागहि कंपनी विकत घेणार आहे. ह्या सर्वांची किंमत सुमारें २.३ कोटी डॉलर्स होते. त्यापैकीं २.२ कोटी इतकी रक्कम परदेशीय चलनांत द्यावयाची आहे. अमेरिकन बँकांनीं

१·६८ कोटी डॉलर्सची सोय करण्याचें ठरविलें असून सुमारें ५३ लाख पौंडांचें कर्ज मिळण्यासंबंधीं लंडन येथें वाटाघाटी चालू आहेत. कारण विमानांचीं एंजिनें ब्रिटिश बनावटीचीं रोल्स राइस घ्यावयाचीं ठरलें आहे. चार अमेरिकन बँका प्रत्येकी २५ लाख डॉलर्सचें कर्ज देणार असून एक बँक १२ लाख डॉलर्स कर्ज देणार आहे. उरलेली ५६ लाख डॉलर्सची रक्कम जागतिक बँक देणार आहे. कंपनी जागतिक बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाचा उपयोग प्रथम करून घेईल आणि १९५९ ते १९६१ पर्यंतच्या कालांत व्यापारी बँकांनीं मंजूर केलेल्या कर्जाचा उपयोग करील. व्यापारी बँका ५ टक्क्यांनीं व्याज घेणार आहेत. कंपनी रकमा काढूं लागेपर्यंतच्या कालांतहि ह्या बँकांना पाऊण टक्का व्याज द्यावें लागेल. जागतिक बँकेच्या कर्जाचा व्याजाचा दर ५॥ टक्के असेल. व्यापारी बँकांचीं कर्जे १९६० ते १९६२ पर्यंतच्या कालांत परत करावयाचीं आहेत. जागतिक बँकेचें कर्ज १९६५ व १९६६ ह्या वर्षांत परत करावयाचें आहे. कंपनीला मिळणारें कर्ज ही एक विशेष महत्त्वाची घटना आहे. कारण, अमेरिकेंतील खाजगी व्यापारी बँकांनीं भारतीय कंपनीला कर्ज देण्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

---

### सेंट्रल वेअरहाउसिंग कॉर्पोरेशनची स्थापना

दि सेंट्रल वेअरहाउसिंग कॉर्पोरेशनची स्थापना दि. २ मार्च रोजीं झाली.

१९५६ च्या दि ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस (डेव्हलपमेंट अ‍ॅण्ड वेअरहाउसिंग) कॉर्पोरेशन ॲक्टांत सदर कॉर्पोरेशनच्या स्थापनेची तरतूद आहे. या कॉर्पोरेशनचे १४ संचालक असतील. भारत सरकारच्या सहा प्रतिनिधींशिवाय त्यांत स्टेट बँक ऑफ इंडियाचा एक व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा एक प्रतिनिधि असेल व बाकीचे ६ बिनसरकारी सदस्य असतील. या ६ जणांत शेड्यूल्ड बँका, को-ऑपरेटिव्ह संस्था, इन्शुअरन्स कॉर्पोरेशन्स, इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट्स व इतर आर्थिक संस्था आणि शेतकी उत्पादनाशीं संबंध असलेल्या सरकारमान्य संस्था व जॉइंट स्टॉक बँका यांचे ४ प्रतिनिधि असतील. मध्यवर्ती शेतकी खात्याचे चिटणीस श्री. पी. एन्. थापर व संयुक्त चिटणीस (को-ऑपरेशन) श्री. कृष्णन चांद हे या कॉर्पोरेशनचे अनुक्रमें अध्यक्ष व उपाध्यक्ष असतील.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत देशांत ठिकठिकाणीं मिळून सुमारें १०० वेअरहाउसेस स्थापन करणें हें या कॉर्पोरेशनचें एक महत्त्वाचें काम असेल. तसेंच हें कॉर्पोरेशन प्रत्येक राज्यांत स्टेट वेअरहाउसिंग कॉर्पोरेशनें स्थापन करण्यांस मदत करील. स्टेट वेअरहाउसिंग कॉर्पोरेशन तदनंतर महत्त्वाच्या ठिकाणीं २५० वेअरहाउसेस स्थापन करतील.

प्रत्येक स्टेट वेअरहाउसिंग कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल २० कोटी रु. चें असेल व त्याची प्रत्येकीं १,००० रु. दर्शनी मूल्याच्या २ लाख शेअर्समध्यें विभागणी होईल. सुरवातीला यांतील निम्में भाग–भांडवल काढण्यांत येईल.

या कॉर्पोरेशनच्या स्थापनेमुळें शिस्तबद्ध बाजारपेठा स्थापण्याच्या दिशेनें एक महत्त्वाचें पाऊल पडत असून, त्यामुळें ग्रामीण विभागांत कर्ज देण्याच्या व्यवस्थेंतहि सुधारणा होईल.

---


खर्चांत बचत करा व पैसा शिलकीत टाका
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
सोनें व सोन्याचे दागिने यांच्या तारणावर माफक दरानें कर्जें दिलीं जातात.
शाखा: फोर्ट, दादर, माहिम, पुणें, बेळगांव.


अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्हा. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— वृ. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

किर्लोस्कर लहान, मोठे लोखंडी नांगर

भारी, मध्यम प्रतीच्या व रेताड जमिनींच्या सर्वोत्कृष्ट नांगरटीसाठीं निरनिराळ्या बनावटीचे योग्य असे लहान व मोठे नांगर तयार होतात. आपल्या जमिनीच्या मगदुराप्रमाणे नांगरांची निवड करा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी द. सातारा

# रेल्वेखात्याचा १९५५–५६ चा वार्षिक अहवाल

**पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षाशीं तुलना करतां या वर्षांत मालवाहतुकींत १७·७९ टक्के व उतारू वाहतुकींत ५·३० टक्के वाढ झाल्याचें दिसून येतें.**

## उत्पन्न आणि खर्च

या वर्षांत रेल्वेखात्याला उतारूवाहतुकीपासून १०७·७१ कोटी रु., मालवाहतुकीपासून १८०·२८ कोटी रु. आणि पार्सलें, सामानसुमान व इतर प्रकारें २८·३० कोटी रु. मिळून एकूण ३१६·२९ कोटी रु. उत्पन्न झालें, तर चालू खर्चाचा आंकडा २१२·९५ कोटी रु. वर गेला. हा आंकडा गतवर्षीपेक्षा ७·०८ कोटी रु. नीं जास्त आहे. घसारानिधींत ४५·४१ कोटी रु. घालण्यांत आलें.

घसारानिधीसुद्धां एकूण खर्च वजा जातां या खात्याकडे या वर्षांत ५०·३४ कोटी रु. उरले. त्यांपैकी ३६·१२ कोटी रु. देशाच्या सर्वसाधारण महसुलांत जमा करण्यांत आले. ते वजा करतां, या वर्षाची निव्वळ शिल्लक १४·२२ कोटी रु. राहिली. ह्या रकमेचा विनियोग ७·०८ कोटी रु. विकासनिधीस व ७·१४ कोटी रु. रेव्हिन्यू रिझर्व्ह फंडास देऊन करण्यांत आला. गतवर्षी निव्वळ ९·१० कोटी रु. शिल्लक उरली होती व ती सर्वच्या सर्व विकासनिधीस देण्यांत आली होती.

मालवहातुकीच्या उत्पन्नांत १९५४–५५ मधील १५६·४५ कोटी रु. वरून १९५५–५६ मध्यें १७७·९२ कोटी रु. पर्यंत वाढ झाली.

या वर्षांत दर माल–टन–मैलांचें सरासरी उत्पन्न १९५४–५५ मधील ११·१ पयांवरून १०·८ पयांवर आलें, तर दर मैलीं दर उतारूपासून होणारें उत्पन्न ५·१५ पयांवरून ५·३४ पयांवर गेलें.

## माल व उतारू वाहतुकीचा उच्चांक

भारतीय रेल्वेनीं या वर्षांत ११५ दशलक्ष टन मालाची भरताड व ३६,४५८ दशलक्ष टन–मैल वाहतूक करून मागील वर्षाचा १०७ दशलक्ष टन माल व ३२,१२६ दशलक्ष टन–मैल हा उच्चांक मोडला.

उतारू वहातुकींतहि १९५४–५५ मधील १,२६१ दशलक्ष वरून १९५५–५६ मध्यें १,२९७ दशलक्षांपर्यंत वाढ झाली. उतारू–मैलांचें प्रमाणहि ३८,६४९ दशलक्षांवरून ३९,०८४ दशलक्षांपर्यंत वाढलें.

रेल्वेखात्याचीं कामें वगळतां, भाडें घेतल्या जाणाऱ्या मालाच्या वाहतुकीकरितां दररोज ब्रॉडगेजवर ११,३७७ व मीटर गेजवर ७,२६४ वाघिणी माल भरण्यांत आला. गतवर्षीचे हेच आंकडे १०,६७२ व ६,४८९ असे होते.

मागील वर्षाशीं तुलना करतां या वर्षांत दर वाघिणी-दिवसास झालेली टन–मैल वाहतूक ब्रॉडगेजवर ४८३ वरून ५४१ वर आणि मीटर गेजवर १९४ वरून २०३ वर गेल्याचें दिसून येतें. म्हणजे हें प्रमाण अनुक्रमें १२·०८ व ४·६४ टक्क्यांनीं वाढलें आहे.

त्याचप्रमाणें या वर्षांत उतारू-गाडी–मैलांचें प्रमाण १·७४ टक्क्यानें वाढून ११५·६३ दशलक्षांवर गेलें. माल–गाडी–मैलांचें प्रमाण ७·०८ टक्क्यांनीं वाढून ८२·५७ दशलक्षांवर गेलें.

रेल्वेखात्याचें उत्पन्न व कामकाज वाढण्यास देशांतील सर्वसाधारण सुधारलेली आर्थिक परिस्थिति कारणीभूत आहे. या वर्षांत देशांतील शेतकी उत्पादनांत सुधारणा झाली, त्याचप्रमाणें औद्योगिक उत्पादनाचें प्रमाणहि गतवर्षीपेक्षा ८ टक्क्यांनीं वाढलें आहे. कोळशाचें उत्पादन तर ३६·९ दशलक्ष टनांवरून ३८·५ दशलक्ष टनांवर गेलें.

## उतारूंसाठी सोई

उतारूंच्या तसेंच, स्टेशनें व गाड्या यांचा उपयोग करून घेणाऱ्या इतरांच्या सोईंत वाढ करण्याकडे यंदाहि खास लक्ष देण्यांत आलें. यंदाच्या वर्षांत २६० मोठ्या स्टेशनांवर पाणी थंडगार करणारीं यंत्रें बसविण्यांत आलीं. गतवर्षीचा हा आंकडा १५८ होता.

या वर्षांत ब्रॉडगेजवर ४४९, मीटर गेजवर ७४४ व नॅरो गेजवर ४८ मिळून एकूण १,२४१ नवे डबे चालू करण्यांत आले. त्यांपैकी ८५२ खालच्या वर्गातील उतारूंसाठी होते. तसेंच या वर्षांत ब्रॉडगेजचीं ४३७, मीटर गेजचीं २२१ व नॅरो गेजचीं १६ नवीं इंजिनें चालू करण्यांत आलीं.

सदर कालांत दुसऱ्या (पूर्वीचा इंटर) व तिसऱ्या वर्गांतील डब्यांत ४,८९२ विजेचे पंखे बसविण्यांत आले. पैकी तिसऱ्या वर्गांतच ४,४५१ पंखे होते.

## भांडवली खर्च

सर्व रेल्वेसाठी लागलेल्या एकूण भांडवली खर्चाचा आंकडा ३१ मार्च, १९५६ रोजीं ९७५·५० कोटी रु. (बांधणी चाललेलें मार्च धरून) आहे. त्यामागील वर्षाचा याच दिनांकाचा हाच आंकडा ९१०·९१ कोटी रु. होता. या रकमेपैकी भारत सरकारच्या रेल्वेचा खर्च ९६८·९८ कोटी रु. असून उरलेला ६·५२ कोटी रु. खर्च कंपन्या व जिल्हाबोर्डें यांच्या भांडवलांतून झाला.

सदर वर्षाच्या शेवटीं भारतांतील रेल्वेच्या खर्च मार्गाची लांबी ३४,७३६ मैल होती. त्यांपैकी ३४,१८२ मैल मार्ग सरकारी मालकीचे होते व ५५४ मैलांचे मार्ग बिनसरकारी व्यवस्थेखाली होते.

अहवालाच्या वर्षांत एकूण १३२·१८ मैलांचे मार्ग चालू झाले. त्यामध्यें नव्यानें टाकण्यांत आलेल्या ५२·९६ मैल मार्गाचा व गेल्या महायुद्धांत उखडून टाकलेल्या पण पुनः चालू करण्यांत आलेल्या ७९·२२ मैलांच्या मार्गाचा समावेश आहे. वर्षाखेरीस ५८१·७३ मैल लांबीच्या मार्गाचें बांधकाम पुरें व्हावयाचें होतें. त्यांत खांडवा–हिंगोली फांटा (१८७·२३ मैल), क्विलोन–अर्नाकुलम फांटा (९६·५५ मैल), इंदूर–देवास–उज्जयिनी मार्ग (५०·०८ मैल) व पोलाद कारखाना विभागांतील इतर कांहीं फाट्यांचा अंतर्भाव होतो.

## सामुग्रीची खरेदी

भारत सरकारच्या रेल्वेनीं सदर वर्षांत स्टोअर्ससाठी १२६·२८ कोटी रु. खर्च केले. त्यापैकी देशी वस्तूंची किंमत ९३·६५ कोटी रु. आहे. १५·१८ कोटी रु. ची सामुग्री थेट परदेशांहून आणण्यांत आली, तर १७·४५ कोटी रु. किंमतीची परदेशी सामुग्री भारतांतील एजन्टांमार्फत खरेदी करण्यांत आली.

## नोकरांची संख्या

सरकारी रेल्वेयंत्रणेंतील कायम, हंगामी व इतर प्रकारच्या कामगारांची संख्या ३१ मार्च, १९५६ रोजीं १०,२७,१६२ होती. ३१ मार्च, १९५५ रोजीं ती ९,८३,२१५ होती.

## गेल्या वर्षांतील बँकिंगविषयक धोरण व घटना

( श्री. वा. पुं. वर्दे यांचें महाराष्ट्र बँकेच्या वार्षिक सभेंत अध्यक्षीय भाषण )

१९५६ सालीं आपल्या देशाची आर्थिक परिस्थिति बरीच ताणली गेली आणि या गोष्टीचे परिणाम बँकांच्या व्यवहारांतहि दृग्गोचर झाले. या सर्व कालांत पैशासाठी जबरदस्त मागणी होती आणि ही मागणी पुरविणें बँकांना फारच कठीण गेलें. या कालांत शेड्यूल्ड बँकांनीं १५६ कोटी रुपयांचीं अधिक कर्जे दिलीं; आणि त्या अवधींत बँकांकडे आलेल्या ठेवी रु. ७९ कोटींनीं वाढल्या. त्यामुळें ठेवींवर द्यावयाचे व्याजाचे दर वाढविणें, इन्व्हेस्टमेंट कमी करणें आणि रिझर्व्ह बँकेकडून त्याच प्रमाणांत कर्जे काढणें याखेरीज बहुतेक बँकांना गत्यंतर राहिलें नाहीं. या सर्वसामान्य परिस्थितीला असलेल्या अपवादांपैकीं एक उल्लेखनीय अपवाद आपली बँक होय.

सरकारी कर्जरोख्यांच्या तारणावर द्यावयाच्या कर्जात रिझर्व्ह बँकेनें अलीकडेच वाढ केली आहे. व्यापारी हुंडींवर मिळणाऱ्या कर्जावर द्यावयाच्या व्याजाचा दर, स्टँप ड्यूटींत वाढ झाली असल्यानें शेंकडाचार इतका झाला आहे. अशा प्रकारें अधिकृत 'बँक रेट' कायम राहिलेला असला तरी रिझर्व्ह बँक देत असलेल्या कर्जाचा दर प्रत्यक्ष व्यवहारांत शेंकडा चार इतका झाला आहे. या देशांत अधिकृत 'बँक रेट' म्हणजे सरकारी कर्जरोख्यांवर रिझर्व्ह बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाचा दर असेंच वस्तुतः मानलें जातें. यामुळें उपयुक्त दोन दरांतील भेद सकृद्दर्शनीं तरी नीट आकलन होत नाहीं. रिझर्व्ह बँकेनें अधिकृत 'बँक रेट' वाढविला नाहीं. याचीं कारणें कांहींहि असोत. प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र रिझर्व्ह बँकेच्या धोरणाचा असा परिणाम झाला कीं बहुतेक बँकांनीं आपापले व्याजाचे दर वाढविले. यावरून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे कीं लोक करीत असलेली बचत आणि ही बचत संकलित करून बँका जीं कर्जे देतात त्या कर्जासाठीं अधिकाधिक होणारी मागणी यांत विलक्षण तफावत आहे. या परिस्थितींत सरकारला लोकांकडून ३॥ टक्के दरानें किती बचत गोळा करतां येईल याची थोडी शंका वाटते. विशेषतः लोकांना आपल्या मिळकतीवर यापेक्षा अधिक दराचें उत्पन्न मिळण्याचे अन्य मार्ग उपलब्ध असतांना लोकांच्या बचतीचा ओघ सरकारकडे कसा वळेल ही एक चिंतनीय गोष्ट आहे. अधिकृत 'बँक रेट' आणि नाणेबाजारांतील परिस्थिति यांत विसंगति ठेवणें आणि व्यवहारांतील प्रत्यक्ष व्याजाचा दर मात्र त्या परिस्थितीशीं सुसंगत राखणें हें धोरण संभाळतांना नाणेबाजारांत सुसूत्रता कायम ठेवणें ही गोष्ट रिझर्व्ह बँकेला कांहींशी कठीण जाईल असें मला वाटतें.

### परस्पर विरोधी धोरणें

या सर्व काळांत दोन परस्पर विरोधी धोरणांचा अवलंब केल्याचें दिसून येतें. खाजगी उद्योगधंद्यांना द्यावयाच्या कर्जासाठीं जें तारण स्वीकारलें जात असे त्यावर चिकित्सक नियंत्रण घातलें गेलें आणि सरकारनें मात्र तुटीच्या अंदाजपत्रकाचा अवलंब करून गेल्यावर्षी रिझर्व्ह बँकेमार्फत रु. २०७ कोटींच्या ट्रेझरी बिल्सचा वटाव केला. तथापि १९५६ सालीं केवळ १३१ कोटी रुपयांची नाणेबाजारांत वाढ झाली. ही वाढ इतकी कमी दिसते याचें कारण हें आहे कीं याच कालांत आपली आयात खूप वाढली, त्यामुळें परदेशी चलनाची आपली शिल्लक रु. ५३० कोटींपर्यंत खाली घसरली. या परिस्थितींमुळें सरकारला रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टमध्यें दुरुस्ती करावी लागली आणि चलनाला तारण म्हणून रिझर्व्ह बँकेकडे असलेल्या परदेशीय नाण्यांच्या निधीची किमान मर्यादा रु. ४०० कोटी करावी लागली व तारणासाठीं असलेल्या सोन्याच्या निधीची किंमत वाढवावी लागली. इतक्यावरच भागलें नाहीं तर इंटरनॅशनल मोनेटरी फंडाकडेहि कर्जासाठीं धांव घ्यावी लागली. रिझर्व्ह बँकेचें बँकांवरील नियंत्रण अधिक पक्कें करण्यासाठीं बँकिंग कंपनीज ॲक्टमध्यें याच काळांत दुरुस्ती करण्यांत आली.

### सरकारचें पैशाच्या उभारणीचें धोरण

सरकारच्या आर्थिक आणि करविषयक धोरणाचे आपल्या आर्थिक जीवनावर फार गंभीर आणि दूरगामी परिणाम होत आहेत हें नाकबूल करतां येणार नाहीं. गेल्या वर्षी औद्योगिक उत्पादन २५ टक्क्यांनीं वाढलें. परंतु प्रतिकूल पर्जन्यवृष्टीमुळें शेतीचें उत्पादन मात्र त्याच प्रमाणांत कमी झालें. आवश्यक वस्तूंची दुर्मिळता, तुटीचें अंदाजपत्रक व तज्जन्य चलनवाढ यामुळें जीवनखर्चाचें प्रमाण वाढलें, कामगारांत असंतोष पसरूं लागला आणि नफ्याचें प्रमाण उत्तरोत्तर कमी होऊं लागलें. आपण सांप्रत चलनवाढीच्या कालांत जीवन जगत आहोंत त्यामुळें रु. च्या क्रयशक्तीची घसरगुंडी होणें हें अनिवार्य आहे. बचतीच्या उत्पन्नावर जगणाऱ्या किंवा स्थिर उत्पन्न असणाऱ्या लोकांना हा काळ कठीण आहे हें उघड आहे. हें मान्य करून देखील ज्या पद्धतीनें देशाच्या आर्थिक विकासासाठीं पैशाची उभारणी करण्यांत येत आहे ती पद्धति कितपत योग्य आहे हा एक विवाद्य मुद्दा ठरेल. एकाद्या व्यक्तीनें अशा पद्धतींचा अवलंब केल्यास ती दोषार्ह ठरते असें असतां केवळ सरकारनें ती गोष्ट केली तर ती तशी ठरत नाहीं असें कसें म्हणतां येईल ? सांप्रतच्या काळांत किंमतींचे दर्शकांक स्थिर राखणें हेंच अतिशय महत्त्वाचें आहे. कारण चलनसंकोच एकदम केल्यास परिस्थिति एकदम उलटी होईल. किंमती एकदम घसरणें हें देशांतील रोजगार व उत्पन्न या दोन्हीं दृष्टींनीं नाहीं. चलनवाढ व चलनसंकोच या दोहोंतील सुवर्णमध्य आपणांस राखला पाहिजे. ही गोष्ट सकृद्दर्शनीं वाटतें तितकी सोपी नाहीं. लोकशाहींतील राजकर्त्यांमध्यें एक दोष उघड असतो. ते अधीर प्रकृतीचे असतात. शक्य तितक्या कमी वेळांत अधिकांत अधिक कामगिरी करून दाखविण्याचा मोह त्यांना टाळणें कठीण असतें.

### रिझर्व्ह बँकेचा सल्ला सरकारनें मानावा

गेल्या दशकांतील आपला अनुभव असा आहे कीं देशाचा विकास आणि चलनस्थैर्य या परस्परविरोधी गोष्टी आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील पहिल्या वर्षी ज्या गोष्टी घडल्या त्यावरून एक गोष्ट स्पष्ट झाली कीं उपलब्ध असलेलें मनुष्यबळ, आर्थिक साहाय्य किंवा साधनसामुग्री यायोगें जितका विकास होऊं शकेल त्यापेक्षा अधिक विकास करण्याचा प्रयत्न करणें यामुळें आर्थिक जीवनांत त्याच विकृती निर्माण होतात. ज्यापासून आगामी कांहीं वर्षे तरी उत्पादनांत वाढ होणार नाहीं अशा प्रकारचा भांडवली खर्च करणें यांतील धोका आतां दृष्टोत्पत्तीस येऊं लागला आहे. फार मोठ्या तुटीचें अंदाजपत्रक केलें गेलें आहे हेंच आपल्या आजच्या आर्थिक दुरावस्थेचें कारण आहे असें म्हटल्यास खचित अतिशयोक्ति होणार नाहीं. या संदर्भात बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर यांच्या एका उक्तीची आठवण येते. मोटारचें रूपक वापरून ते म्हणतात कीं सार्व-

-जानिक सर्चाच्या 'अॅक्सिलरेटर' वर एक पाय ठेवणें व बँक देत असलेल्या कर्जावर नियंत्रण या 'ब्रेक' वर दुसरा पाय ठेवणें यायोगें देशाचा आर्थिक विकासाचा वेग इष्ट तो राखता येत नाहीं. अंतर्गत आर्थिक सामर्थ्य नसेल तर परदेशांत आपली पत राहूं शकत नाहीं. समाधानाची गोष्ट ही आहे कीं आपण आपल्या अनुभवानें शहाणे होत आहोंत आणि चुकीच्या दिशेनें पडत असलेलीं पावलें इष्ट त्या दिशेनें पडण्याची काळजी घेत आहोंत. तथापि ज्या प्रमाणांत उपाययोजना व्हावयास पाहिजे तशी ती होत नसल्यामुळें आपली आर्थिक विकृति विशेष सुधारत नाहीं. पुनश्च एकदां बँक ऑफ इंग्लंडच्या गव्हर्नरचा मी आपणाला दाखला देतों. अलीकडील एका भाषणांत त्यांनीं कटु आणि अप्रिय परंतु सत्य तेंच सांगण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ते म्हणतात " जेव्हां सरकार आणि सरकारसदृश संस्था देशाच्या उत्पन्नापेक्षा अधिक प्रमाणांत खर्च करीत असतात तेव्हां घोषणाचा लाल कंदील दाखविणें हें देशांतील मध्यवर्ती बँकेचें प्रमुख कर्तव्य ठरतें. ज्या परिस्थितींत अलीकडे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. रामाराव निवृत्त झाले, त्यावरून आपल्या सरकारला मध्यवर्ती बँकेच्या अप्रिय परंतु हितप्रद सल्ला देण्याच्या क्षमतेबद्दल मन सांशक होतें. मला अशी आशा आहे कीं, रिझर्व्ह बँक करीत असलेल्या बहुमोल कामगिरीची आपले राज्यकर्ते योग्य ती दखल घेतील. अर्थशास्त्रांतील या मूलभूत सिद्धांताकडे आपल्या राज्यकर्त्यांनीं दुर्लक्ष करतां कामा नये कीं, आपलें नाणें हिणकस करून देशाची आर्थिक उन्नत्ति होत नाहीं; उलट आपलाच दाम आपणच खोटा केल्याचा दोष मात्र पदरीं येतो.

---

**सीलोनला भारताची साखर**— सीलोननें भारताकडून ८ हजार टन साखर घेण्याचा सौदा केला आहे. भारतामधील साखर सीलोनच्या बाजारपेठेंत विकली जाण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. ह्या वर्षी भारत सरकारनें ५० हजार टन साखर निर्यात करण्यास मंजुरी दिली आहे. कांहीं साखर पाकिस्तानला पाठविण्यांत आली आहे.

**अंदमानमध्यें दारुबंदी**—अंदमान व निकोबार बेटांतील अधिकाऱ्यांनीं दर आठवड्यांत मंगळवार ते शनिवार हे पांच दिवस दारुबंदीचे म्हणून ठरविले आहेत. बेटांतील स्थानिक रहिवाशांनीं संपूर्ण दारुबंदीची मागणी केल्यामुळें हा उपक्रम चालू करण्यांत आला आहे. संपूर्ण दारुबंदी १५ ऑगस्टेपर्यंत करण्यांत येईल.

**कोळ्यांना कर्जें देण्याची व्यवस्था**—मद्रास सरकारनें राज्यांतील मच्छीमारीचा धंदा करणाऱ्या कोळ्यांना धंद्यासाठी कर्जें देण्याची योजना तयार केली आहे. ह्या योजनेप्रमाणें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत २० लाखांपर्यंत कर्जें देण्यांत येतील. चालू वर्षी १,००० कोळ्यांना मिळून २,१०,००० रुपयांचीं कर्जें देण्यांत येतील. कर्जें १० वार्षिक हप्त्यांत फेडावयाचीं आहेत.

**चीनची बाजारपेठ पाहिजे**—चीनशीं व्यापार करण्यावर ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडनें नियंत्रणें घातलेलीं आहेत. पण ब्रिटनमधील ट्रॅक्टरचे कारखानदार आपल्या मालासाठी चीनची बाजारपेठ मिळविण्यास उत्सुक आहेत. एका वर्षापूर्वी नियंत्रणें तात्पुरती ढिलीं करण्यांत आलीं असतां ब्रिटिश कारखानदारांनीं ५०० ट्रॅक्टर्स चीनला पुरविले होते.


# बँक ऑफ पूना लिमिटेड
## ( शेड्यूल्ड बँक )
—मुख्य कचेरी : ४५५ रविवार, पुणें २.—

—शाखा—

( १ ) ३६१ सदाशिव, पुणें.
( २ ) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
( ३ ) सोलापूर. ( ४ ) सांगली.

—ःव्याजाचे दरः—

चालू ठेव—अर्धा टक्का. सेव्हिंग्ज—दोन टक्के.
२ महिन्यांच्या पुढें मुदतीच्या ठेवीवर तीन टक्के व्याज.

★ सांगली शाखा व मुख्य ऑफिसमध्यें मूल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याकरितां अल्प भाड्यानें लॉकर मिळतील.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड
हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर्स

### दि बेळगांव बँक लि., बेळगांव

वरील बँकेला १९५६ मध्यें, मागील शिलकी नफा १,०५५ रु. धरून, एकूण ८०,०६२ रु. नफा झाला. गेल्या वर्षीपेक्षा नफा सुमारें २८,००० रु. नीं वाढला आहे. नफ्याची वाटणी डायरेक्टरांनीं खालीलप्रमाणें सुचविली आहे :—

| | रु. |
|---|---|
| ६% डिव्हिडंड + १½% बोनस (करमाफ) ... | ३७,५०० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | १६,००० |
| इन्कमटॅक्सची तरतूद ... ... | २०,००० |
| बॅडडेट रिझर्व्ह ... ... | ५,००० |
| पुढील हिशेबात ... ... | १,५६२ |
| एकूण रु. | ८०,०६२ |

अहवालाचे वर्षी बँकेचे व्यवहार समाधानकारक झाले. ठेवींत एकसारखी होत असलेली वाढ जनतेच्या विश्वासाची निदर्शक आहे. सरकारी रोख्यांतील व इतर अल्पकालीन रोख्यांतील गुंतवणुकींचे ठेवींशीं प्रमाण मोठें राखण्यांत येऊन, पैशांचा तरतेपणा कायम ठेवलेला आहे. शाखांचें काम वाढत आहे. बार्शी येथील नव्या शाखेस समाधानकारक पाठिंबा मिळत आहे. मुख्य कचेरींतील नव्या व सुसज्ज सेफ डिपॉझिट व्हॉल्टचा उपयोग बेळगांवमधील व आजूबाजूच्या खेड्यांतील लोक वाढत्या प्रमाणावर करीत आहेत.

बँकेच्या प्रगतीचे तुलनात्मक आंकडे "अर्था"च्या दि. १३ फेब्रुवारीच्या अंकांत दिलेले आहेत. बँकेची वार्षिक सभा दि. २६ मार्च रोजीं बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या इमारतींत भरणार आहे.

### बँकांचें एकत्रीकरण

ग्रिंडलेज बँक लि. चें सर्व भाग भांडवल नॅशनल बँक ऑफ इंडिया लि. नें कांहीं वर्षांपूर्वी खरीदल्यामुळें, पहिली बँक ही दुसरीची केवळ एक शाखा बनली. तथापि ग्रिंडलेज बँकेचा कारभार पूर्वीप्रमाणेंच चालू ठेवण्यांत आला. दोन्ही बँकांचें एकत्रीकरण करण्याचें आतां ठरलें आहे. १९५८ च्या प्रारंभापासून एकत्रित बँक नव्या नांवानें व्यवहार करूं लागेल.

### रत्नागिरी येथें बँक मॅनेजरसाठी निरोपसमारंभ

रत्नागिरी येथील सर्व बँकांच्या लोकांनीं श्री. रामनाथन्, एजंट, स्टेट बँक ऑफ इंडिया यांना त्यांचे बदलीनिमित्त एकत्र निरोपसमारंभ दि. १ मार्च रोजीं केला.

प्रथम येथील रत्नागिरी अर्बन को-ऑ. बँकेचे मॅनेजर श्री. भाटवडेकर यांनीं यथोचित स्वागत करून सर्व लोकांची ओळख करून दिली. त्यानंतर श्री. आपटे, व्हा. चेअरमन, रत्नागिरी अर्बन बँक यांनीं सुयश चिंतिलें. श्री. सरदेसाई, एजंट, महाराष्ट्र बँक, यांनीं गौरवपर भाषण केल्यावर श्री. खानोलकर, एजंट, कोंकण बँक यांनीं पुष्पहार अर्पण केला. श्री. कामत, एजंट, कॅनरा इंडस्ट्रिअल बँकिंग सिंडिकेट यांनीं सर्वांचे आभार मानले. श्री. रामनाथन् यांनीं निरोप स्वीकारून, सर्व बँकांचे लोक एकत्र येऊन असोसिएशन स्थापावी अशी इच्छा प्रदर्शित केली व एकूण येथील बँकांच्या कामकाजाबद्दल यथोचित सूचना केल्या. त्यानंतर अल्पोपहार होऊन हा कार्यक्रम संपला.

**कॅन्सर रोगाचीं इस्पितळें**—मुंबई येथील टाटा मेमोरिअल हॉस्पिटल आणि कलकत्ता येथील चित्तरंजन कॅन्सर इन्स्टिटयूट ह्या कॅन्सरवर उपाय करणाऱ्या दोन संस्था भारत सरकार आपल्याकडे घेणार आहे. कलकत्ता येथील इस्पितळ येत्या एप्रिल महिन्यांत सरकारकडे घेतलें जाईल. मद्रास येथील कॅन्सर रिसर्च इन्स्टिटयूटहि ताब्यांत घेण्यासंबंधीं विचार चालू आहे.

**अनामत रकमेचें उत्पन्न**—चालू सार्वत्रिक निवडणुकांत पंजाबमधील १०६ उमेदवारांना आपली अनामत रक्कम गमवावी लागली. राज्य सरकारच्या तिजोरींत त्यामुळें २४,००० रुपयांपेक्षा आधिक रकमेची भर पडली. पंजाबमधील निवडणूक खात्याला निवडणुकीसाठी सुमारें २० लाख रुपये खर्च येईल. कांहीं खर्च मध्यवर्ती सरकार देणार आहे.

**तंत्रज्ञांना परदेशीं शिक्षण**—भोपाळ येथें भारी वजनाची विजेची यंत्रसामुग्री तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे; कारखान्याच्या विविध विभागांत काम करण्याचें शिक्षण घेण्यासाठीं २७ हिंदी तंत्रज्ञ लवकरच ब्रिटनला जाणार आहेत. निरनिराळ्या कारखान्यांत त्यांच्या शिक्षणाची सोय केली आहे.

**दक्षिण ध्रुवप्रदेशांत विमानतळ**—दक्षिण ध्रुवप्रदेशांत व्यापारी विमानांना वापरता येईल अशा प्रकारचा एक विमानतळ बांधतां येईल काय, ह्या प्रश्नाचा अमेरिकन सरकार विचार करीत आहे. अमेरिकेकडून ऑस्ट्रेलिआला जाण्यास त्याचा विशेष उपयोग होईल.

**पाकिस्तानला आर्थिक मदत**—चालू वर्षांत अमेरिकेकडून पाकिस्तानला ५७ कोटी रुपयांची रक्कम अमेरिकेच्या परदेशीय साह्य योजनेप्रमाणें मिळण्याची शक्यता आहे. अमेरिकेकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीच्या बाबतींत पाकिस्तानचा क्रमांक चौथा आहे.

**टाळेबंदीची चौकशी**—भडोच येथील गोपाळ मिल्सच्या चालकांनीं धंद्यांत तोटा होतो असें कारण देऊन गिरणी ता. ५ मार्चपासून बंद ठेवली आहे. गिरणींत २,२०० मजूर काम करीत होते. सर्व परिस्थितीची चौकशी करण्यासाठीं मुंबई सरकारनें औद्योगिक कलह कायद्याप्रमाणें तजवीज केली आहे.

**एका मतासाठीं ७०० रुपयांचा खर्च**—हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या एका मतदान केंद्रांत फक्त एका धनगर मतदारानें आपलें मत दिलें. मतदान केंद्राला जाण्याचा रस्ता अवघड होता. ह्या केंद्रांतील काम पहाण्यासाठीं सरकारला ७ माणसांची योजना करावी लागली आणि त्यासाठीं ७०० रुपये खर्च करावे लागले.

**इस्माइल कॉलेजांतील राखीव जागा**—१९१४ मध्यें सर महंमद युसुफ ह्यांनीं मुसलमानांच्या उच्च शिक्षणासाठीं ८ लक्ष रुपयांची देणगी मुंबई सरकारला दिली, ती सरकारनें स्वीकारून अंधेरी येथें इस्माइल कॉलेजची स्थापना केली. जून १९५२ मध्यें, हिंदी घटना मंजूर झाल्यानंतर, सरकारनें सर महंमद युसुफ ह्यांना कळविलें, कीं मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांखेरीज इतर कोणत्याहि विद्यार्थ्यांसाठीं जागा राखून ठेवल्या जाणार नाहींत. ह्यासंबंधांत पत्रव्यवहार चालू असतांना, सरकारनें सिटी सिव्हिल कोर्टाकडे अर्ज केला, तो त्या कोर्टानें मंजूर करून, देणगीदाराच्या अटींतून सरकारची मुक्तता केली. म्हणून, देणगीदारानें मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें, तें दाखल करून घेण्यांत आलें आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें